# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

E-mail ID - education.nmc@gmail.com Landline No.0712-2567028

जा.क्र.3633/शि.वि. / 2017 दि.27/01 / 2017

**स्मरणपत्र**

प्रती,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा, म.न.पा. नागपूर.

**विषय : आपले शाळेतील विद्यार्थ्यांना बुट व मोजे खरेदी करण्यास्तव रक्कम मंजुर करण्याबाबत व तशा आशयाच्या सुचना विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन देण्याबाबत.**

**संदर्भ :** 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग निर्णय क्र.डिसीटी 2316/प्र.क्र.133/का.1417, दि.05.12.2016
2. शिक्षण विभाग परिपत्रक क्र.3466/शि.वि./2017, दि.04.01.17
3. शिक्षण विभाग परिपत्रक क्र.3518/शि.वि./2017, दि.11.01.17

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये कळविण्यात येते की, शासनाव्दारे थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात येत आहे. जेणेकरुन लाभार्थ्यांना योजनांचा पुर्णपणे लाभ मिळेल. DBT कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यास्तव विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. यास्तव,

1. पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्यांच्या आधार क्रमांकाशी जोडणी (Seeding) करणे.
2. निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणाला मान्यता देवून त्यांना लेखी कळविणे.
3. लाभार्थ्यांनी परिमाणाप्रमाणे (Specification) वस्तूंची खरेदी करणे.
4. संबंधित यंत्रणेने लाभार्थ्याने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहनिशा करुन पुर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्याच्या बँक खात्यावर योजने अंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे.
5. लाभार्थ्यांना रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान त्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यात यावे.

याबाबत विस्तृत सुचना संदर्भिय पत्र क्र.2 व 3 मध्ये आपणांस देण्यात आलेले आहेत. या दोन्ही परिपत्रकांमध्ये दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करुन संपूर्ण खरेदी प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या पालकांकडून करून त्यांची बिले/पावत्या कार्यालयात सादर करण्याची संपूर्ण कार्यवाही दि.15.02.2017 पर्यंत करावयाची आहे. यात काही हयगय झाल्यास मुख्याध्यापक यांना जबाबदार धरण्यात येईल.

(फारुक अहमद खान)
शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:3/D/SRW/Letter & note/Letter(2).doc